प्रेस नोट                    दिनांक २४/०६/२०१९

**सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नंबर २८९/२०१९ भादंवि सं कलम ३८६, ३४१, ५०६(२), ५००, ३४ मधील आरोपी गुन्हे शाखा, युनिट-२ कडून जेरबंद**

सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नंबर २८९/२०१९ भादंवि सं कलम ३८६, ३४१, ५०६(२), ५००, ३४ मधील पाहीजे आरोपी नामे अमोल विष्णु टेकाळे, वय ३२ वर्षे रा. स्वारगेट पोलीस लाईन, ६ पोलीस उप निरीक्षक क्वार्टर, स्वारगेट पुणे. याने त्याचे दाखल गुन्हयातील इतर साथीदारांसमवेत संगनमत करून यातील फिर्यादी नामे सुभाष दत्तात्रय यादव वय-२८ वर्षे, धंदा-अभिनय, रा. गुलमोहर सोसायटी, शास्त्री रोड, पुणे. यांचे विरुध्द वानवडी पोलीस ठाणेस दाखल असलेला गुन्हा मिटवण्यासाठी आरोपी नामे राम जगदाळे याचे ऑफिसमध्ये बोलावून तेथे फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांना तीन तास अटकावून ठेवून जबरदस्तीने आरोपी रोहीणी माने हीचे पाय धरून माफि मागण्यास लावली व त्याचे चित्रीकरण अटक आरोपी अमोल विष्णु टेकाळे याने करून रु १५ लाखाची मागणी केली व त्यापैकी १ लाख रुपये त्याने स्वीकारले आहेत. तद्नंतर उरलेली रक्कम न दिलेने सर्व आरोपींनी संगनमत मरून यातील पाहीजे आरोपी सारा श्रवण हिचे मार्फतीने पाय धरून माफि मागितलेचा व्हीडीओ समाजमाध्यमांवर प्रसारीत करून फिर्यादींची बदनामी करून मिटींग दरम्यान पिस्तूलचा धाक दाखवून जीवे मारण्याची, ॲसीड टाकून मारणेची तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर दाखल गुन्हयातील आरोपी अमोल विष्णु टेकाळे हा त्याचे पत्नी मुलांसह गायब होवुन आपले अस्तीत्व लपवीत होता. त्यास दिनांक २३/०६/२०१९ रोजी २१.१५ वा. अटक करण्यात आली असुन दिनांक २४/०६/२०१९ रोजी मा. न्यायालयात रिमांड रिपोर्ट सोबत पोलीस कस्टडी रिमांड मिळणेकामी हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही मा. श्री अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर, मा. श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-२ चे इंचार्ज पोलीस निरीक्षक, श्री. गजानन पवार, सपोनि श्री जयवंत जाधव, सपोफौ श्री यशवंत आंब्रे, पो हवा अजय खराडे, पो ना विशाल भिलारे, पो शि अजित फरांदे कादिर शेख, यांनी केलेली आहे.